# स्त्री भ्रूणहत्या आणि स्त्रियांवरील वाढते अत्याचार

## एक सामाजिक समस्या



प्राचार्य डॉ. [illegible]
डॉ. [illegible]

Scanned by CamScanner

Pg. 106 to 113

# स्त्री भ्रूणहत्या आणि स्त्रियांवरील वाढते अत्याचार :

## एक सामाजिक समस्या

संपादक

प्राचार्य डॉ. सं. ना. भारंबे

डॉ. साधना बी. जावळे

प्रा. रुपाली व्ही. कोल्हे

प्रशांत पब्लिकेशन्स

Scanned by CamScanner

**स्त्री भ्रूणहत्या आणि स्त्रियांवरील वाढते अत्याचार :**
एक सामाजिक समस्या

**प्रकाशक व मुद्रक**
श्री. रंगराव पाटील
**प्रशांत पब्लिकेशन्स**
३, प्रतापनगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड,
नूतन मराठा महाविद्यालयाजवळ,जळगाव-४२५००१.
☎ (०२५७) २२३५५२०,२२३२८००
Website : www.prashantpublications.com
E-mail : sales@prashantpublications.com

**प्रथमावृत्ती : १४ मार्च २०१५**

ISBN : 978-93-85021-90-9

© लेखकाधीन

**अक्षरजुळणी**
प्रशांत पब्लिकेशन्स

**मूल्य : ₹ ३२५/-**

या पुस्तकाचे सर्व अधिकार लेखकाधीन असून, या पुस्तकातील कोणताही मजकूर, तक्ता किंवा तत्सम संकल्पना यांची कोणत्याही प्रकारे नक्कल करणे किंवा यांत्रिकी साधनांनी फोटोकॉपी, रेकॉर्डिंग करणे कायद्याने गुन्हा असून, असे आढळून आल्यास तत्काळ कारवाई करण्यात येईल.



Scanned by CamScanner

# तिला वाचवा, तिला शिकवा, भविष्य घडवा

प्रा.सौ. सुजाता चंद्रकांत पाटील,
वाणिज्य विभाग,
अ.र.भा. गरुड कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय,शेंदुर्णी.

**प्रस्तावना :**

भारतातील कुटुंबव्यवस्था आणि स्त्रीला मिळणारा मानसन्मान ही बाब पाश्च्यात्य देशात कुतुहलाचा विषय आहे. असे असतांनाही आपल्याकडील स्त्री पुरूष प्रमाणाचा समतोल ढासळतांना दिसत आहे. ही बाब चिंताजनक आहे. मुलींचा जन्मदर कमी होण्यामागे बदलत चाललेली मानसिकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गर्भाचे लिंगनिदान करून स्त्रीभ्रूणहत्येचे वाढते प्रमाण यामुळे चिंताजनक परिस्थती निर्माण झाली.म्हणूनच गेल्या काही वर्षांपासून मुलींचे घटते प्रमाण हा सर्वत्र चिंतेचा विषय झालेला आहे.या विषयावर सर्वत्र जोरदार चर्चा होत आहे. स्त्रीभ्रूणहत्येस प्रतिबंध करण्यासाठी कायदा केला गेला. पण हा प्रश्न केवळ कायद्याने सुटणार नाही तर त्यासाठी व्यापक जनजागृतीची गरज आहे.आणि ही महिलांसोबतच पुरूषांची देखील सामाजीक जबाबदारी आहे.गर्भजलचिकीत्सा करण्यावर कायद्याने बंदी असली तरी यात समाजाचा पुढाकार अतिशय महत्वाचा आहे.

**समस्या :**

खरच वंशाला दिव्याची गरज असते काय? जर गरज असेलच तर अशा लाडावलेल्या किती दिवटयांनी आपल्या स्वतःच्या आईवडिलांसाठी किती दिवे लावलेत? हे आपल्याला समाजात आजूबाजूला नजर टाकली तर लक्षात येईलच.समाजासाठी काही करणे तर दूरच.तरीही आजही अनेकांना वंशाचा दिवा म्हणून मुलगाच हवा.हया परिस्थितीत बदल होणे नितांत गरजेचे आहे.

''गर्भलिंगनिदान चाचणीनंतर केली जाणारी स्त्रीअर्भकाची हत्या म्हणजेच स्त्रीभ्रूणहत्या''

दोषी व्यक्तीस शिक्षेची तरतुद आहे.एकदा गुन्हा केल्यास ३ वर्ष कैद व १० हजार रूपये दंड हाच गुन्हा दोन वेळा असल्यास ५ वर्ष कैद व ५० हजार रूपये दंड शिक्षेची तरतुद करण्यात आलेली आहे.तसेच संबंधित डॉक्टरच्या क्लिनीकची नोंदणी रद्द करण्याची तरतूद सुध्दा कायद्यात करण्यात आलेली आहे.तरीसुध्दा



Scanned by CamScanner

दरहजारी पुरूषांमागे महिलांचे प्रमाण घटलेले दिसत आहे. या परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी उद्‌बोधनाची नितांत गरज आहे.म्हणूनच म्हणावेसे वाटते की, स्त्रिभ्रूणहत्येला देउ नका थारा,तरच देशाचा विकास होईल खरा टाळू हत्या स्त्रीजन्माची, मिळवू शक्ती देशाच्या विकासाची आहे चाहे तो क्या नही कर सकती बेटीयाँ.आचल आपका खुशियो से भर सकती है बेटियाँ

**सद्यः परिस्थिती**

स्त्रीभ्रूणहत्येस प्रतिबंध करण्यासाठी कायदयाचे पालन आज बऱ्याच प्रमाणात होतांना दिसत आहे. तसेच शासन ,स्वयंसेवी संस्था ,अनेक विचारवंत तसेच व्यक्तिगत पातळीवर अनेक लोक याबाबत उदबोधनासाठी पुढे सरसावत आहेत.देशभर या विषयावर वैचारिक मंथन सुरू झालेले दिसत आहे.याचाच परिणाम म्हणून आज बऱ्याच प्रमाणात समाजजागृती झालेली आढळून येत आहे. तसेच बऱ्याच प्रमाणात स्त्रीजन्माचे स्वागतही केले जात आहे.

असे असले तरी स्त्रीला कमी लेखणे ,तिला दुय्यम दर्जा देणे हे मात्र कमी झालेले आढळत नाही.हा पुरूषी अहंकाराचाच भाग आहे तेवढाच स्त्रीयांच्या मानसिकतेचा सुध्दा यात समावेश आहे.म्हणूनच केवळ कायदे किंवा धाकदडपशा दाखवून उपयोग नाही तर समाज बदलाच्या मानसिकतेसाठी सर्व सुज्ञ घटकांनी पुढे येण्याची गरज आहे.मुलांना सांभाळणे ही आईबरोबर वडिलांचीही जबाबदारी आहे.मुलीही चितेला अग्नी देऊ शकतात.तसेच स्त्री पुरूष संख्या समान नसेल तर समाजाचे स्वास्थ्य धोक्यात येऊ शकते याची दखल सर्वांनी घेणे गरजेचे आहे. स्त्रीपुरूषांची क्षमता, कार्यक्षमता ,कार्य करण्याची पध्दत ,कौशल्य सारखीच असते. म्हणून घरात व नोकरीव्यवसायाच्या ठिकाणी त्या स्त्रिया आहेत म्हणून त्यांचे हक्क डावलले जाऊ नयेत . या वृत्तीची जोपासना स्त्री व पुरूष या दोघांमध्ये होण्याची आवश्यकता आहे.

**विविध कालखंडातील स्त्री प्रतिमा :**

प्राचीन काळी गार्गी, मैत्रेयी या विदुषींना समाजमान्यता होती .वेदअध्ययनात त्याअग्रेसर होत्या.लीलावतीने सभामंडप गाजवलेला होता.म्हणजेच प्राचीन काळी ज्ञानाची कवाडे स्त्रियांसाठी खुली होती परंतू मध्ययुगीन काळात स्त्री फक्त सेवा देणारीच राहिली. घरात व शेतात राबतांना ज्ञानाचे भांडार तिच्यापासून दूर राहिले. रूढी व परंपरांचा पगडा अधिक झाल्याने हळूहळू स्त्रियांचे स्वातंत्र नष्ट होऊन त्यांचे कार्यक्षेत्र उंबरठ्याच्या आतच सिमित झाले.



Scanned by CamScanner

त्यानंतर मात्र ब्रिटिशांच्या काळापासून स्त्रियांच्या स्थितीत हळूहळू सुधारणा होत गेली. कारण याच कालखंडात स्त्रीला शिक्षणाच्या वाटा दाखविणारे अनेक महात्मे, समाजसुधारक उदयास आले.स्त्री शिक्षण पुरस्कर्ते स्वामी विवेकानंदांनी तर उल्लेख केला आहे की स्त्रियांच्या समस्या शिक्षणानेच सुटतील. स्त्रिया शिक्षणानेच स्वावलंबी बनतील. ज्या देशात स्त्रियांना योग्य सन्मान मिळतो आणि त्यांच्या सर्वांगीन विकासास अनुकुल वातावरण निर्माण केले जाते तोच देश प्रगतीपथावर वाटचाल करतो. आजच्या महिलेजवळ काही अधिकार आलेले आहेत.काही प्रमाणात ती शक्तिमान झालेली आहे.हे अधिकार, ही शक्ती तिला कुणी दिली नाही तर तीने स्वतः ते मिळविले.महिलांना त्यांचे अधिकार मिळणे व त्यांचे सशक्तिकरण होण्याची नितांत आवश्यकता आहे.तसेच महिलांची कायदेशीर लढाई व महिलांचे हक्क जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

**स्त्रीयांपुढील आव्हाने :**

आज स्त्रीभ्रूणहत्येचे वाढते प्रमाण लक्षात घेता देवाजवळ दुवा मागण्याची वेळ आलेली आहे की नारी कधी या भुतलावरून नष्ट होऊ नये.मुलींबद्दल या ठिकाणी म्हणावेसे वाटते की,

दिवार की शान होती है खिडकीयाँ,
घर की पहचान होती है लडकियाँ
जीस दिवार मे खिडकी नही वह मस्जीद जैसी है,
जीस घर मे लडकी नही वह शमशान जैसा है

प्राचिन काळात स्त्रियांचा सामाजिक दर्जा फार उच्च होता. तो अर्वाचिन काळात खाली घसरला.जगातील कोणत्याही देशात स्त्रियांना इतका मान सन्मान मिळत नव्हता त्या वेळी भारतातील स्त्रियांना तो मिळत असे.पण त्यानंतर त्यांची जी अवनती झाली ती कोणामुळेक्र आजच्या स्थितीत आधुनिक स्त्री पारंपारिक चौकट मोडून शिक्षणाच्या जोरावर स्वावलंबी बनली, अर्थार्जन करू लागली आहे. पुरूषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात तिने झेप घेतलेली आहे.परंतू ही स्त्री खरोखरच सबला झाली आहे काक्र याविषयी विचार होणे गरजेचे आहे. तसेच जरी स्त्रीअत्याचाराविरूध्द जगभरातील महिलांमध्ये जागृती निर्माण झालेली आहे. परंतू लिंगभेद भेदभावविरोधी कायद्यांची अंमलबजावणी म्हणावी तशी नाही. स्त्रीभ्रूणहत्या, ॲसिड हल्ले, बलात्कार, लैंगिक शोषण, ऑनार किलींग यासारखे अत्याचार हे महिला सबलीकरणातील प्रमुख अडथळे आहेत.

२१ व्या शतकाच्या सुरूवातीस होणारे बदल लक्षात घेता तंत्रज्ञानक्षेत्रात



Scanned by CamScanner

तंत्रज्ञानामुळे झालेले बदल,संगणक,इंटरनेट तसेच मोबाईलचा वाढता वापर या बाबींमुळे समाजात बऱ्याच प्रमाणात बदल घडून येतांना दिसत आहेत.या सर्वाचा परिणाम स्त्रीजीवनाबरसुध्दा झालेला आढळून येत आहे.अनेकविध क्षेत्रांमध्ये पुरूषांच्या बरोबरीने काम करतांना महिलांच्या पुढे नवनवीन आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.त्याअनुसरूनच महिलांच्या पूर्वीच्या भूमिकेमध्ये परिवर्तनाची गरज आहे.त्यासाठीसुध्दा मुलींविषयी समाजात असलेली मानसिकता बदलण्याची नितांत आवश्यकता आहे. बऱ्याचश्या कुटंबात अशी धारणा असते की,अस्तनीत निखारा ठेवण्यापेक्षा उजवलेलीच बरी.म्हणून मुलीचे कमी वयातच व शिक्षण अर्धवट असतांनाच लग्न लावून दिले जाते. समाजाचा महिलांकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन तसेच महिला सबलीकरणाचा पाहिजे तेवढा परिणाम आजही दिसून येत नाही.

सर्वच क्षेत्रात आज महिलांचे पदार्पन आपणास बघावयास मिळत आहे. पुरूषांच्या बरोबरीने कार्य करीत असतांना महिलांपुढे नवनवीन आव्हानांना सतत सामोरे जावे लागत आहे.त्यामुळेच समाजाने हे लक्षात घेऊन स्त्रियांना वाव देण्याची नितांत गरज आहे. भूमिकांमध्ये बदल घडवून आणण्याची नितांत गरज आहे.

पंडित नेहरू नी म्हटलेलेच आहे की ,“You can tell the condition of a nation by looking at the status of women.”

जनजागृती तसेच सर्व शिक्षा अभियानामुळे सध्या मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे.आपल्या महाराष्ट्र राज्यात तसेच संपूर्ण देशातील दहावी बारावी परीक्षांचा निकाल लक्षात घेतला तर आपल्या लक्षात येते की उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण अधिक आहे. तसेच गुणवत्ता यादीत मुलींची कामगिरी मुलांपेक्षा सरस आहे. असे असले तरी उच्च शिक्षणक्षेत्रात मात्र मुलींचे प्रमाण अतिशय कमी आढळते. काही थोडया महिलाच उच्च पदावर कार्यरत आहेत. राष्ट्रपतीपदावर एक महिला विराजमान झाली.शेताच्या बांधापासून देशाच्या सीमेपर्यंत महिला विराजमान झाली.महिला कतृत्व गाजवित आहे.वैज्ञानिक पध्दतीने शेती करर्णाया स्त्रियांपासून अंतराळात सशोधन करर्णाया स्त्रिया आज आहेत. परंतू हे प्रमाण अतिशय कमी आहे.

**स्त्री अत्याचाराचे परिणाम :**

१) महिलांचे प्रमाण घटले.

२) महिलांच्या शारिरिक, मानसिक व वैचारिकतेवर विपरित परिणाम.

३) शारिरिक यातनांच्या प्रमाणात वाढ.



Scanned by CamScanner

४) महिलांवरील अत्याचारात वाढ उदा.किडनॅप ,लग्नासाठी विक्री, बलात्कार.
५) आत्महत्येचे प्रमाण वाढले.
६) एका मुलाच्या जन्मासाठी १ किंवा जास्त मुलींना गर्भातच मरावे लागते.
७) प्रेयसी ,बायको ,सून ,आई पाहिजे पण मुलगी नको अशी परिस्थिती निर्माण झालेली आढळते.
८) महिलेवर दबाव निर्माण केला जातो व तिच्यावर शारिरिक व मानसिक अत्याचार करण्यात येतात.

**उपाययोजना :**

बचतगटातील महिलांपासून अवकाशात भरारी घेणाया अंतराळवीरापर्यंत मुलींनी विविध क्षेत्रात मिळवलेल यश पाहिल तर मुलामुलीत करण्यात येत असलेला भेदभाव किती तकलादू आहे हे लक्षात येते.अनेक क्षेत्रात महिलांना उच्चपदाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात या संधीना आव्हान म्हणून महिलांना स्विकारण्यासाठी समाजातून वाव मिळण्याची गरज आहे. हया प्रत्येक क्षेत्रात पुरूषांची असलेली मक्तेदारी नष्ट करून स्त्रियांनी स्वयंसिध्दा बनून अस्तित्व सिध्द करण्याची आजच्या काळात आवश्यकता आहे.

म्हणूनच समाज बदलाची वाट बघत वेळ वाया घालवण्यापेक्षा आजच्या कर्तबगार स्त्रियांनी बदलत्या सामाजिक परिस्थितीशी जुळवून घेतांना विपत्तीचा गिरी जरी तुजसमोर ठाकला दे धडक तू बेधडक अन फोड त्याजला याप्रमाणे वागण्याची नितांत आवश्यकता आहे.कारण स्त्रियांच्या ठिकाणी प्रचंड ऊर्जा असते या ऊर्जेचा उपयोग समाजाच्या विकासासाठी व विधायक कार्यासाठी करून घेतल्यास समाज नक्कीच प्रगतीपथावर जाऊ शकतो. शिवाय सध्याच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीतील सर्वच आव्हानांना त्या समर्थपणे तोंड देऊ शकतील.

**अत्याचारमुक्तीसाठी काही ठळक मुद्दे :**

**१) शिक्षण:** शिक्षणामुळे स्त्रिया बदलत्या सामाजिक परिस्थितीत निर्माण होणाऱ्या आव्हानांना समर्थपणे तोंड देऊ शकतील.व्यक्तिमत्वाचा विकास होऊन त्यांचे प्रश्न सुटण्यास मदत होईल.यात स्वसंरक्षणाचे शिक्षण देण्याची सुध्दा नितांत आवश्यकता आहे.तरच स्त्रिया अत्याचारमुक्त होतील.

डॉ. कोठारी यांनी म्हटले आहे की ,मानवी साधनसंपत्तीच्या विकासासाठी, गृहसुधारणेसाठी व बाल्यावस्थेच्या संस्कारक्षम वयात मुलांच्या चारित्र्याची योग्य घडण करण्यासाठी स्त्रीशिक्षण अधिक महत्वाचे आहे.



Scanned by CamScanner

समाजाने स्त्रीला कोणते स्थान दिले त्यावरून त्या समाजाची प्रगती व संस्कृती जाणावी. समाजात स्त्रीचे स्थान हे तिने संपादन केलेल्या शिक्षणावरून निश्चित होत असते म्हणून स्त्री साक्षरतेकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याची गरज आहे. या कार्यात सुध्दा समाजाची भूमिका महत्वाची ठरते.शिक्षणामुळे नोकरीची संधी उपलब्ध झाल्यामुळे महिला सबल झालेली दिसून येते. म्हणूनच सार्वत्रिक स्त्रीशिक्षणाची आवश्यकता आहे.

२) **बचतगट सहभाग** : महिलांना प्राधान्य द्यावयाचे असल्याने प्रत्येक तालुक्यातून स्थापन करावयाच्या बचत गटांपैकी ५० टक्के निव्वळ महिला बचत गट असावेत. बचत गटातील महिलांनी अन्य महत्वाच्या सामाजिक प्रश्नांच्या जसे आरोग्य,सामाजिक स्वास्थ्य, शिक्षण, बालसंगोपन ,अंधश्रध्दा निर्मुलन इ. च्या सोडवणुकीसाठी सहभागी व्हावे, यासाठी त्यांचे प्रबोधन करणे व जाणीव जागृतीचा कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.कारण महिलांमध्ये टॅलेंट भरपूर पण समाजाची साथ हवी.

३) **अंधश्रध्दा निर्मूलन करण्यासाठी प्रयत्नांची गरज** : पुर्वापार चालत आलेल्या रूढी परंपरांवर आधारीत निराधार गोष्टींचा त्याग करून अंधश्रध्दा निर्मुलनासाठी प्रयत्न करण्याची आजच्या समाजाची जबाबदारी आहे.उदा.मुलगी परक्याचे धन ,मुलगा मात्र कुळाचा उध्दारकर्ता .विज्ञानाच्या आधारे सत्य जगासमोर मांडण्याची जबाबदारी आजच्या स्त्रीची तसेच समाजाची आहे.आज वस्ती तेथे बचतगट आहेत या बचतगटांच्या माध्यमातून अंधश्रध्दा निर्मुलनाचा प्रसार करता येईल.

४) **स्व सुरक्षा**: महिलांना जर सक्षम करावयाचे असेल तर त्यांचा जीवनप्रवास सुरक्षित करणे सर्वाधिक गरजेचे आहे.गतिशीलतेमुळे महिला अधिक सक्षम होऊ शकतात.कौटुंबिक हिंसाचार सहन करू नका, त्यातून मरण ओढवू शकते.तसेच बदलत्या सामाजिक परिस्थितीत महिलांना नौकरी व्यवसायानिमित्ताने घराबाहेर पडावे लागते. त्यामुळे स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित होतो. परंतू या प्रश्नावर स्त्रिया संघटित रित्या मात करू शकतात.अपमानास्पद वागणूक टाळू शकतात. स्त्रीअत्याचाराचा विरोध करण्यासाठी स्त्रियांनी स्वयंसिध्दा बनण्याची गरज आहे.

५) **स्त्रीअत्याचाराविरूध्द आवाज** : स्त्रीअत्याचाराविरूध्द जागृती निर्माण करण्याची गरज आहे हे लक्षात घेण्याची जबाबदारी आजच्या स्त्रीची आहे उदा .मानवी हक्कासाठी लढा देणारी बालवीर मलाला युसुफझाई जीने मानवी हक्कांसाठी लढा दिला. तिला नोबेल शांतता पुरस्काराने गौरवविण्यात आले. राज्यात कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ ची अंमलबजावणी २६ ऑक्टोबर २००६



Scanned by CamScanner